आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता
२० एप्रिल २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- ईस्टरच्या सणाचा सर्वत्र उत्साह

- युक्रेनबरोबरच्या युद्धाला ईस्टरनिमित्त ३० तासांचा विराम देण्याची रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची घेषणा

- अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हॅन्स उद्यापासून ४ दिवस भारत दौऱ्यावर

- महाराष्ट्रात गडचिरोली इथं ४ नक्षली अतिरेक्यांना अटक

**आणि**

- जम्मू काश्मिरमधे हिमवर्षाव आणि भूस्खलनाचे ३ बळी

**<><><><><>**

ईस्टर म्हणजेच प्रभू येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा दिवस आज सर्वत्र भक्तीभावात साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी यानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईस्टरनिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईतल्या अनेक चर्चेस मधे आज प्रार्थना आणि प्रवचनाचे कार्यक्रम होत आहेत.

हा सण नवीन आशा आणि नव्या प्रारंभाची प्रेरणा देतो असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभसंदेशात म्हटलं आहे. प्रभू येशू ख्रिस्तांची मानवता, करुणा आणि सेवा यांची अजरामर शिकवण सौहार्दपूर्ण सामाजिक जीवनासाठी मार्गदर्शक असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी य़ांनी ईस्टरनिमित्त दिलेल्या शुभेच्छांमधे सर्वांना आनंद आणि सलोख्याची कामना केली

आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला ईस्टरनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनविरोधात सुरू असलेल्या युद्धादरम्यान ईस्टर निमित्त  ३० तासांच्या युद्धविरामाची घोषणा केली आहे. येत्या रविवारपर्यंत हा युद्धविराम लागू असेल. युक्रेनियनही याचं अनुकरण करेल अशी अपेक्षा असल्याचं पुतीन यांनी म्हटलंय. या युद्धविरामातून युक्रेनलाही युद्धविराम हवा आहे की नाही, हे रशियाला ठरवता येईल असं त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी हा युद्धविराम ३० दिवसांपर्यंत वाढवावा अशी मागणी केली आहे. सौदी अरेबियात अमेरिकेसोबत झालेल्या यशस्वी चर्चेनंतर, अमेरिकेच्या ३० दिवसांच्या युद्धविरामच्या प्रस्तावाला पुतीन यांनी अद्याप मान्यता दिलेली नसल्याचंही त्यांनी नमूद केलं आहे.

<><><><>

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हॅन्स चार दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. जे. डी. व्हॅन्स यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. ते उद्या सकाळी नवी दिल्ली इथं पोहोतील. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी आणि मुलं तसंच अमेरिकीच्या प्रशासनातले काही वरिष्ठ सदस्य देखील असणार आहेत.

उद्या संध्याकाळी ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. आपल्या भारत भेटीत ते दिल्ली इथं काही भेटी घेतील, यासोबतच ते आग्रा आणि जयपुरलाही भेट देतील.

जे. डी. व्हॅन्स यांच्या या भेटीदरम्यान दोन्ही देशांच्या शिष्टमंडळात परस्पर हिताच्या प्रादेशिक तसंच जागतिक घडामोडींवर विचारांची देवाणघेवाण केली जाणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. याशिवाय अमेरिका

आणि भारताला, परस्परांच्या द्विपक्षीय संबंधांच्या प्रगतीचा, तसंच फेब्रुवारी महिन्यात प्रधानमंत्र्यांनी अमेरिकेला दिलेल्या भेटीतल्या संयुक्त निवेदनातील मुद्यांच्या अंमलबजाणीचा आढावा घेण्याची संधी मिळेल असंही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

इंटरपोलनं बाग्लादेशाच्या माजी प्रधानमंत्री शेख हसीना, माजी मंत्री आणि अवामी लीगचे सरचिटणीस ओबैदुल कादर आणि माजी गृहमंत्री असदुज्जमान खान यांच्यासह १२ जणांविरोधात रेड नोटीस जारी करावी अशी विनंती बांग्लादेशाच्या राष्ट्रीय तपास यंत्रणेनं केली आहे. बांग्लादेशाच्या पोलीस मुख्यालयाचे माध्यम सहाय्यक एनामुल हक सागोर यांनी ही माहिती दिली. शेख हसीना आणि इतर फरार घोषित केलेल्यांना अटक करण्यासाठी इंटरपोलची मदत घ्यावी अशी विनंती बांग्लादेशातील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या मुख्य अभियोजक कार्यालयानं  पोलिस मुख्यालयाला केली होती. त्यानंतर इंटरपोलला ही विनंती केल्याचं त्यांनी सांगितलं. या विनंतीवर सध्या प्रक्रिया सुरु असल्याचं त्यांनी सांगीतलं.

<><><><><>

रोजगार हमीच्या कामांची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक उद्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. पैठण तालुक्यातल्या ११० गावांपैकी ३० गावांची हे पथक तपासणी करणार आहे. अभिलेखे, सोई सुविधा उपलब्ध आहेत की नाही याची चौकशी या दौऱ्या अंतर्गत केली जाणार असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या नियोजित सौदी अरेबिया दौऱ्यासाठी परवा मंगळवारी जेद्दाह इथं पोहोचतील. भारताच्या प्रधानमंत्र्यांची या शहराला गेल्या जवळपास चार दशकांतली ही पहिलीच भेट असणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री

निर्मला सीतारामन आजपासून अमेरिका आणि पेरु या देशांच्या अधिकृत दौऱ्यावर आहेत.

<><><><><>

फ्रान्समधे होणाऱ्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी  'स्थळ', 'स्नो फ्लॉवर','खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या  चार मराठी चित्रपटांची निवड झाली आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव होत आहे. महोत्सवासाठी पाठवण्यात येणाऱ्या चित्रपट निवडीसाठी तज्ज्ञांची समिती नेमली होती. त्यात  आदित्य सरपोतदार, निखिल महाजन, गणेश मतकरी, इरावती कर्णिक, अपूर्वा शालिग्राम यांचा यात समावेश होता.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश संघटनेत राज्यभरात एकूण १२२१ मंडळ स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. यातील २५८ मंडळे नव्यानं स्थापन केली गेली आहेत. भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीनं करण्यात आल्याचा पक्षाचा दावा आहे. पक्षाची जनाधारावर आधारित शक्ती  वाढवण्याचा हा प्रयत्न आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यपद्धतीची ही सुरुवात आहे. भाजपची रणनीती आता अधिक गावखेड्यांपर्यंत पोहोचण्याची आणि सर्वसामान्य मतदाराशी थेट संवाद साधण्याची आहे.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात पल्ली जंगलात ४ खतरनाक नक्षलींना काल अटक केली . सी 60 कमांडोच्या हत्येत त्यांचा सहभाग होता आणि त्यांच्यावर ४० लाख रुपयांचं बक्षीस लावलं होतं. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज ही माहिती दिली. ताडगाव पोलीसठाण्याच्या हद्दीत चौघे संशयास्पद रीतीने वावरत असलेले आढळले.  सुरक्षापथकानं त्यांना हटकलं तेव्हा सी 60 कमांडोंच्या हत्त्येप्रकरणी ते हवे असलेले नक्षलवादी ते असल्याचं उघड झालं. त्यांच्या नावे विविध गुन्ह्यांची नोंद आहे. जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती नीलोत्पल यांनी दिली.

छत्तीसगडमधे नारायणपूर इथं पाच नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली असून, त्यात ४ महिला आहेत. एकूण  वीस नक्षलवाद्यांनी शस्त्र समर्पण केल्याची माहिती इंडो-तिबेटन बॉर्डर पोलिस- आ.य.टी.बी.पी.ने दिली. सुकमा इथं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांच्या उपस्थितीत  २२ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली, त्यात ९ महिला होत्या. आत्मसमर्पण केलेल्यांना सरकारच्या धोरणांतर्गत सर्व लाभ मिळणार आहेत. या महिन्याच्या सुरुवातीला दंतेवाडा इथं २६ माओवाद्यांनी पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दल-सीआरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करली होती.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरच्या रामबन जिल्ह्यात झालेल्या हिमवृष्टीमधे तिघांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या असून जोरदार वारे वाहत आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात मालमत्तेचं नुकसान झालं आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरे कोसळली असून १०० नागरिकांची सुटका केली आहे. धर्मकुंड गावात पुरामुळे ४० हून अधिक घरांचं नुकसान झालं आहे.

जम्मू काश्मीरमधील परिस्थितीवर लक्ष ठेवून असून त्याबाबत सातत्यानं उपजिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात असल्याचं केंद्रीयमंत्री जितेंद्र सिंह यांनी समाजमाध्यवर केलेल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय पोषण पंधरवडा सुरू आहे. यानिमित्त वाशिम जिल्ह्यातले प्रकल्प अधिकारी संजय धनराज गणवीर यांनी दिलेली माहिती.आता आपण ऐकूया..

**होल्ड -वाशिम बाइट...**

<><><><><>

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता चंदीगड इथं पंजाब किंग्ज आणि रॉयल चँलेजर्स बंगरुळू तर,रात्री साडेसातला मुंबईमध्ये मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज असे सामने होत आहेत. अहमदाबाद इथं काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं दिल्ली कॅपिटल्स संघाचा सात गडी राखून पराभव केला. तर,जयपूर इथं झालेल्या सामन्यात, लखनौ सुपर जायंट्सनं राजस्थान रॉयल्सला दोन धावांनी हरवलं.

<><><><><>

लडाखमध्ये जोरदार हिमवृष्टी होत असून कारगिलमधे जनजीवन विस्कळीत झालं आहे. पुढचे काही दिवस हिमवादळाची शक्यताही हवामान खात्यानं वर्तवली आहे. मुसळधार पावसामुळे पूर आणि त्यामुळे भूस्खलनाचा धोका लक्षात घेऊन नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. कारगिल-श्रीनगर आणि कारगिल - जनसंगकार मार्गावर बर्फ साठल्यानं या मार्गावर वाहतूक बंद आहे. तसंच हिमवृष्टीमुळे श्रीनगर-सोनमर्ग-गुमरी मार्ग सलग दुसऱ्या दिवशी बंद आहे. काश्मीर आणि लडाखला जोडणाऱ्या महामार्गावरून नागरिकांनी प्रवास करू नये अशा सूचना दिल्या आहेत.

जम्मू-काश्मीर, लडाख,गिलगिट-बाल्टिस्तान आणि मुजफ्फराबाद इथं बहुतांश ठिकाणी उद्या पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता भारतीय हवामान खात्यानं वर्तवली आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेशातही उद्या जोरदार वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालयात पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज आहे. विदर्भात पुढचे तीन दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्रात हवामान दमट राहील, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

<><><><><>

गेल्या चार वर्षात भारताचा परकीय चलनसाठा बाजार दुपटीने वाढल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. बाली इथं एका परिषदेला ते आज संबोधित करत होते. भारताची वित्तीय बाजारपेठ एक गतीमान शक्ती म्हणून उदयाला आल्याचं मल्होत्रा यावेळी म्हणाले.

//<><><><><>//